राज्य भूजल प्राधिकरणाची बैठक दिनांक २१ जून, २०२२ रोजी दुपारी १२:३० वाजता संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (भूसविय), पुणे येथे झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीचे कार्यवृत्त

सभेला खालील सदस्य उपस्थित होते :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. साधना महाशब्दे | - | सदस्य (विधी) - बैठकीच्या अध्यक्षा |
| २. | श्री. संजय कुलकर्णी | - | सदस्य (अभिसं) |
| ३. | श्रीमती श्वेताली ठाकरे | - | सदस्य (अर्थ) |

इतर उपस्थित अधिकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ.रामनाथ सोनवणे | - | सचिव [मुंबई कार्यालयातून VC द्वारे उपस्थित] |
| २ | श्री.दिलीप पाटोळे | - | सहायक संचालक |
| ३ | श्री.प्रभाकर खिरे | - | सल्लागार |

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयाचे उपस्थित अधिकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.) | - | आयुक्त, भूसविय. पुणे |
| २ | श्री.पाखमोडे | - | अधिकारी, भूसविय, पुणे |
| ३ | श्री. भोयर | - | अधिकारी, भूसविय, पुणे |

मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता -

प्राधिकरणाची दिनांक १७.०२.२०२२ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

मुद्दा क्र. १ : २४ सप्टेंबर २०२० च्या CGWA च्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही - कायदा व नियमातील बदल करणेबाबत -

दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ च्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, आयुक्त, भूसविय यांनी दिनांक १३.०५.२०२२ च्या पत्रान्वये आवश्यक प्रस्ताव ४ पर्यायांसहित शासनास सादर केला.

त्याची प्रत बैठकीच्या वेळी प्राधिकरणास देण्यात आली. प्राधिकरण याविषयी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे समवेत भूसवियं व प्राधिकरण बैठक घेण्याची विनंती करील असे ठरले.

मुद्दा क्र. २ : कलम ४ नुसार क्षेत्र अधिसुचनेबाबत -

पुणे जिल्हयाचा १ : १०००० या स्केलने नकाशा जोडून व अद्ययावत (सन २०20 नुसार) भूजल अंदाजानुसार ऑगस्ट २०२२ अखेर सादर करण्याचे भूसवियंने मान्य केले. इतर उर्वरित १२ जिल्हयांचे सुधारित दृष्टिनिबंधही ऑगस्ट २०२२ अखेर अंतिम होणा-या भूजल अंदाजानुसार सुधारित करून सप्टेंबर २०२२ अखेरपर्यंत भूसवियं प्राधिकरणास सादर करील.

मुद्दा क्र. ३ : लघुपाणलोट क्षेत्रांच्या (Mini Watershed Boundaries) सुधारित सीमा निश्चित करून क्षेत्र अधिसूचनेसाठी उपलब्ध करण्याबाबत -

टोपोशीटच्या आधारे केलेल्या पूर्वीच्या नकाशामुळे जलसंपदा विभाग व भूसवियंच्या क्षेत्रातील तफावत दूर करून लघुपाणलोट क्षेत्रांचे नकाशे MRSAC च्या सहाय्याने GIS तंत्रज्ञान वापरुन तयार केले आहेत. हे नकाशे ऑगस्ट २०२२ पर्यंत प्राधिकरणास सादर केले जातील.

मुद्दा क्र. ४ : श्री. ढोका यांचे NGT तील याचिकेवरील उत्तरादाखल सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र -

GSDA ने प्रतिज्ञापत्र अद्याप केले नाही. परंतु, पर्यावरण नुकसान भरपाईचे रु.२२२ कोटी रक्कम तपासून देण्यासाठी भूसवियं अथवा मजनिप्रा हे सक्षम प्राधिकरण नसल्याबाबत एकमत झाले.

मुद्दा क्र.५ : क्षेत्र अधिसूचनेसाठी CGWA च्या कार्यपद्धतीत अंतर्भूत क्षेत्र वर्गवारीची व्याख्या स्वीकारणेबाबत -

याबाबत भूसवियंने दिनांक १३.०५.२०२२ च्या पत्राने शासनास स्वीकृतीबाबत कळविले आहे. त्यावर लवकरच निर्णय होणे अपेक्षित आहे.

मुद्दा क्र. ६ : केंद्रिय भूजल प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना, २०२० स्वीकारावयाच्या झाल्यास rig registration व well registration ची माहिती online पद्धतीने देण्यासाठी software विकसित करणे आणि या कामाची (registration करण्याच्या) रुपरेषा निश्चित करणे -

शासन स्तरावर CGWA च्या मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत असे नियम होईपर्यंत पुढील कार्यवाही करता येणार नाही. असे शासनाने भूसावियंला कळविले आहे. यावर वरील मुद्दा क्र.१ नुसार कार्यवाही करण्याचे ठरले. शासनाच्या सदर पत्राची प्रत भूसावियं प्राधिकरणास देईल.

मुद्दा क्र.७ : मुद्दा क्र. ७ : CGWA च्या guidelines नुसार भूजल उपशांवरील आकार वसूल करण्याबाबत लेखापद्धती (Account Procedure) ठरविणेबाबत -

याबाबत CGWA ची 'NOCAP' संगणक प्रणाली तयार असल्याचे भूसावियंने प्रतिपादन केले.

मुद्दा क्र. ८ : भूसावियं कडे प्रलंबित अन्य प्रकरणे -

(१) मुंबई भूजल अंदाज - ऑगस्ट २०२२ पर्यंत सन २०२० चे सुधारित भूजल अंदाज देताना मुंबई विषयी अहवाल सादर करण्याचे मान्य केले.

(२) नियम अधिसूचनेसाठी पाठपुरावा : तो सातत्याने भूसावियं कडून केला जात आहे व काम अंतिम टप्प्यावर आहे असे स्पष्ट करण्यात आले.

(३) जिल्हा प्राधिका-यांची कार्यशाळा - प्राधिकरणाने सुचविल्यानुसार प्रत्येकी २ महसूल विभागांकरिता ३ ठिकाणी कार्यशाळा नियम अंतिम झाल्यावर घेण्याचे ठरले.

(४) पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन समित्या (WWRC) स्थापन करणे बाबत - नियम राजपत्रात अधिसूचित झाल्यावर प्रस्तावित समित्या स्थापन करण्यात येतील.

(५) पर्जन्य जलसंचयाच्या पुनर्भरण क्षेत्राचे नकाशे व मार्गदर्शक सूचना - भूसावियंच्या website वर उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले (१: ५०००० स्केलने ४३००० गावांचे)

(६) आयत्यावेळी झालेला विषय : जलसंपदा विभागाच्या पाटबंधारे संशोधन व विकास मंडळाकडे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील विहिरींच्या पाणी पातळी निरीक्षणाच्या नोंदी भूसवियंला पुरविण्याबाबत प्राधिकरणाकडून संबंधित कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास विनंती करण्यात येईल.

सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली..

दिनांक : २१.०६.२०२२

स्थळ : पुणे

(डॉ. रामनाथ सोनवणे)

सचिव

श्री.संजय कुलकर्णी
सदस्य (अभिसां)

डॉ. साधना महाशब्दे
सदस्य (विधी)
बैठकीच्या अध्यक्षा

श्रीमती श्वेताली ठाकरे
सदस्य (अर्थ)